<table>
<tr><td>MHND160009072025</td><td>दाखल दिनांक</td><td>:</td><td colspan="3">११/०६/२०२५</td></tr>
<tr><td rowspan="4"></td><td>नोंदणी दिनांक</td><td>:</td><td colspan="3">११/०६/२०२५</td></tr>
<tr><td>निकाल दिनांक</td><td>:</td><td colspan="3">११/०८/२०२६</td></tr>
<tr><td rowspan="2">कालावधी</td><td rowspan="2">:</td><td>वर्षे</td><td>महिने</td><td>दिवस</td></tr>
<tr><td>०१</td><td>०२</td><td>००</td></tr>
</table>

## प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, हदगांव जि. नांदेड याच्या न्यायालयात
(पिठासीन अधिकारी श्री.अमरजीत भारतराव जाधव)

**नियमीत फौजदारी खटला क्र.१०२/२०२५** **निशाणी क्र.–३७**

**फॉर्म – अ**

| | |
|---|---|
| तक्रारदार / फिर्यादी | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पो.स्टे. हदगाव, ता. हदगाव, जि. नांदेड |
| प्रतिनिधीत्व | शासनातर्फे विद्वान विधिज्ञ श्री. टी. जे. मोमीन |
| **आरोपी** | **१– राजु अशोक कांबळे**<br>वयः ३१ वर्षे, धंदाः मजुरी,<br>**२– अनिल अशोक कांबळे**<br>वयः ३० वर्षे, धंदाः मजुरी,<br>**३– कुसुमबाई अशोक कांबळे**<br>वयः ५५ वर्षे, धंदाः गृहिणी,<br>**४– कोमल राजु कांबळे**<br>वयः २२ वर्षे, धंदाः गृहिणी,<br>सर्व रा. काळेश्वर हदगाव जि. नांदेड |
| **प्रतिनिधीत्व** | आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री.एस.एम.जाधव |

**फॉर्म – ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख वेळ व स्थळ | दि. २८/०३/२०२५ रोजी ८.०० वाजताच्या सुमारास काळेश्वर हदगाव, जि. नांदेड येथे. |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २९.०३.२०२५ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | ०३.१०.२०२५ |
| पुरावा सुरु होण्याचा दिनांक | १०.०८.२०२६ |
| ज्या दिवशी निकाल राखुन ठेवला तो दिनांक | ११.०८.२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाची तारीख | ११.०८.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर. | निरंक. |

## फॉर्म – क

| आरोपी अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जामीन दिल्याचा दिनांक | गुन्हा | निर्दोष /दोषी | शिक्षा ठोठावली | फौ.प्र.सं. च्या कलम ४२८ च्या उद्देशाने अटकेत ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **राजु अशोक कांबळे** | भा.ना.सु. सं. चे कलम ३५(३) प्रमाणे नोटीसवर. | ०३.१०. २०२५ | भा.न्या.सं. चे कलम ११८ (१) ११५ (२), ३५२ ३५१(२) (३) सह कलम ३(५) अधिनियमान्वये | निर्दोष | – | – |
| २. | **अनिल अशोक कांबळे** | भा.ना.सु. सं. चे कलम ३५(३) प्रमाणे नोटीसवर. | ०३.१०. २०२५ | भा.न्या.सं. चे कलम ११८ (१) ११५ (२), ३५२ ३५१(२) (३) सह कलम ३(५) अधिनियमान्वये | निर्दोष | – | – |
| ३. | **कुसुमबाई अशोक कांबळे** | भा.ना.सु. सं. चे कलम ३५(३) प्रमाणे | ०३.१०. २०२५ | भा.न्या.सं. चे कलम ११८ (१) ११५ (२), ३५२ | निर्दोष | – | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोटीसवर. | | ३५१(२) (३) सह कलम ३(५) अधिनियमान्वये | | | |
| ४. | **कोमल राजु कांबळे** | भा.ना.सु.सं. चे कलम ३५(३) प्रमाणे नोटीसवर. | ०३.१०.२०२५ | भा.न्या.सं. चे कलम ११८ (१) ११५ (२), ३५२ ३५१(२) (३) सह कलम ३(५) अधिनियमान्वये | निर्दोष | – | – |

**<u>फॉर्म – ड</u>**

**फिर्यादी/बचाव पक्ष/न्यायालय/साक्षीदारांची यादी**

**(अ) फिर्यादी साक्षीदारांची यादी.**

| अ.क्र. | नाव | निशानी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | सुभाष बळीराम कांबळे | २८ | फिर्यादी |
| सा.क्र.२ | विक्रम सुभाष कांबळे | ३१ | साक्षीदार |
| सा.क्र.३ | अमोल विश्वास कांबळे | ३२ | साक्षीदार |

**(ब) बचाव पक्ष साक्षीदारांची यादी**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

**(क) न्यायालय साक्षीदारांची यादी.**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

**<u>फॉर्म – इ</u>**

**फिर्यादी/बचाव पक्ष/न्यायालय/निशाणी क्रमांक यादी**

**(अ) फिर्यादी नि.क्र.यादी.**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | २९ | फिर्याद वरील सही |
| २. | ३० | छापिल प्रथम खबर अहवाल वरील सही |

**(ब) बचाव पक्ष नि.क्र. यादी.**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३३ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | ३४ व ३५ | वैदयकिय प्रमाणपत्र |

**(क) न्यायालय नि.क्र.यादी.**

| अ.क्र. | वर्णन | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | दोषारोप | १५ |
| २. | आरोपीचे निवेदन | १६ ते १९ |

**(ड) मुद्देमाल वस्तु.**

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**–<u>न्या य नि र्ण य</u>–**

**(घोषित दिनांक ११ ऑगस्ट २०२६)**

आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० (येथून पुढे संक्षिप्तपणे भा.द.सं.) चे कलम भा.न्या.सं.चे कलम ११८(१),११५(२),३५२, ३५१(२), ३५१(३) सह कलम ३(५) प्रमाणे संपरिक्षा घेण्यात आली.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की,**

**२.** फिर्यादी– सुभाष बळीराम कांबळे, राहणार काळेश्वर हदगाव, जिल्हा नांदेड (यांना येथून पुढे फिर्यादी असे संबोधले आहे.) हे दि २८/०३/२०२५ रोजी अंदाजे रात्री ८.०० वाजताच्या सुमारास ते बुध्दविहाराकडून त्यांचे नवीन घराचे बांधकाम होत असलेल्या घराकडे जात असतांना त्यांच्या शेजारी राहणारा राजु अशोक कांबळे हा फिर्यादीची पत्नी रतनबाई हिच्यासोबत वाद घालत होता म्हणून फिर्यादी काय झाले हे विचारण्यासाठी तेथे गेले असता, राजु त्यांना म्हणाला की, ''

तुम्ही घर बांधकामाचे मटरेल रस्त्यावर का टाकले, आम्ही कोठुन जायचे'' त्यावर फिर्यादी म्हणाला की,'' घराचे मटरेल रस्त्याच्या कडेला आहे, तुम्ही बाजूने जावू शकता रस्ता मोकळा आहे'' त्यावर राजु याने फिर्यादी व त्यांची पत्नी यांना शिवीगाळ केली. फिर्यादीने शिवीगाळ करु नका असे म्हणाले असता, राजुने तिथे पडलेल्या विटकरीचा तुकडा पकडून फिर्यादीच्या डोक्यात मारुन जखमी केले. फिर्यादीचा मुलगा सोडविण्यासाठी आला असता, त्याच्यापण डोक्यात विटकरीचा तुकडा मारुन जखमी केले. त्यावेळी तेथे अनिल अशोक कांबळे, कुसुमबाई अशोक कांबळे, कोमल राजु कांबळे हे आले व फिर्यादीच्या मुलास थापड बुक्यांनी मारहाण केली.फिर्यादीच्या गावातील अमोल विश्वास कांबळे, यांनी भांडण सोडवविण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही राजु, अनिल, कुसुमबाई व कोमल यांनी थापडबुक्यांनी मारहाण केली. फिर्यादीच्या मुलास ''तु कसा तुझे शिक्षण पुर्ण करतो, तुमचे मुडदे पाडतो'' अशी जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीने सदर घटनेबाबत हदगाव पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली.

**३.** हदगाव पोलीस ठाणे अंमलदार यांनी गुन्हा नोंद क्र.९५/२०२५ भा.न्या.सं.चे कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) सह कलम ३(५) प्रमाणे गुन्हा नोंदविला व त्याचा तपास हेड कॉन्सटेबल १२३९ श्री. जी.एम.वेरुळकर यांनी केला. तपासी अंमलदार यांनी गुन्हयाच्या तपासादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले, तपासाअंती आरोपींविरुध्द भा.न्या.सं.चे कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) सह कलम ३(५) नुसार न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** मी आरोपींविरुध्द भा.द.सं. चे कलम भा.न्या.सं.चे कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) सह कलम ३(५) प्रमाणे दोषारोप (नि.क्र.१५) निश्चित केला व आरोपींना समजावून सांगितला असता त्यांनी गुन्हा नाकबूल करून संपरीक्षा चालविण्याची विनंती केली. आरोपींवरील दोषारोप सिध्द करणेसाठी अभियोग पक्षाने फिर्यादी सुभाष बळराम कांबळे (अ.सा.क्र.१), साक्षीदार

विक्रम सुभाष कांबळे (अ.सा.क्र.२), साक्षीदार अमोल विश्वास कांबळे (अ.सा.क्र.३), यांची साक्ष नोंदविली आहे. फिर्यादी व अभियोगपक्ष यांनी निशाणी क्र.३६ प्रमाणे संयुक्त पुरावा बंदची पुरसिस दाखल केली. आरोपींविरुध्द गुन्हयात गोवणारा कोणताही पुरावा न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम ३५१ प्रमाणेचे निवेदन/जबाब निशाणी क्र.०१ वरील आदेशाप्रमाणे तोहमत करण्यात आले.

**५.** अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले त्यावरून माझे विचारार्थ निघालेले मुद्दे व निष्कर्ष मी कारणेमिमांसासहित खालीलप्रमाणे नोंदवीत आहे.

| **अ.क्र.** | **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि.२८/०३/२०२५ रोजी ८.०० वाजताच्या सुमारास काळेश्वर हदगाव जि. नांदेड येथे आरोपींनी संगनमताने आरोपी क्रं १ याने फिर्यादी व त्यांचा मुलगा यांच्या डोक्यावर विटकरीच्या तुकडयाने मारहाण करुन जखमी केले **भारतीय न्यायसंहिताचे चे कलम ११८(१) सह कलम ३(५)** प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नाही.** |
| २. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादी यास थापड बुक्यांनी मारहाण केली व त्यानुसार त्याने **भारतीय न्यायसंहिताचे चे कलम ११५(२) सह कलम ३(५)** प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नाही.** |
| ३. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपींनी संगनमताने फिर्यादीस शिवीगाळ करून अपमानित केले व अशी शिवीगाळ केल्यास तो प्रक्षोभित होवून सार्वजनिक शांततेचा भंग करेल किंवा त्याच्या हातून अपराध घडेल हे त्यांना ज्ञात असताना देखील किंवा त्याच उद्देशाने त्यांना प्रक्षोभित केल्याचे व त्यानुसार त्यांनी **भारतीय न्यायसंहिताचे चे कलम ३५२ सह कलम ३(५)** प्रमाणे अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ४. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादीस धमकी दिली व त्याच्या मनात भीती निर्माण करुन घाबरविण्याचा किंवा त्याला आवश्यक नसलेले कायदेशिर कृत्य करायला भाग पाडण्याचा प्रयत्न केला व त्यानुसार त्यांनी **भारतीय न्यायसंहिताचे चे कलम ३५१ (२) सह कलम ३(५)** प्रमाणे अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नाही.** |
| ५. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदार यांना ठार मारण्याची धमकी देवून गुन्हेगारी भीती निर्माण केली व त्यानुसार त्यांनी **भारतीय न्यायसंहिताचे चे कलम ३५१ (३) सह कलम ३(५)** प्रमाणे अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नाही.** |
| ६. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>–का र ण मि मां सा–</u>

**<u>मुद्दे क्र.१ ते ५ बाबतः</u>**

वरील मुद्दे एकाच घटनेशी संबंधीत असल्याने पुनरावृत्ती टाळण्याकरिता एकत्रीत विचारात घेण्यात आले आहेत.

**६.** सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.टी.जे.मोमीन आणि आरोपीचे विधीज्ञ श्री.एस.एम.जाधव यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

**७.** फिर्यादी–सुभाष बळीराम कांबळे (अ.सा.क्र.१) यांच्या साक्षीवरुन असे दिसून येते की, दि २८/०६/२०२५ रोजी आरोपी व त्यांच्यात आपसात बोलचाल झाली होती. आरोपी क्रं १ व २ हे त्यांचे पुतणे असून, आरोपी क्रं ३ ही भावजय व आरोपी क्रं ४ ही सून आहे. त्यांना कोणीही मारहाण केली नाही. त्यांनी रागाच्या भरात पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली परंतु त्यांना त्यातील मजकुर माहित

नसल्याचे कथन केले. साक्षीदार विक्रम सुभाष कांबळे (अ.सा.क्र.२), साक्षीदार अमोल विश्वास कांबळे (अ.सा.क्र.३), यांच्या साक्षीमध्ये घटना काय घडली हे त्यांना माहित नाही. त्या दिवशी आरोपी व त्यांच्या कुरबुर झाली होती. याशिवाय त्यांना काहीही माहित नाही. त्यांना कोणीही मारहाण केली नाही. पोलीसांनी त्यांचा जबाब घेतला होता. परंतु त्यातील मजकुर त्यांना आठवत नसल्याचे कथन केले. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर फिर्यादी व ईतर साक्षीदार हे सहकार्य करीत नसल्याने त्यांना उलटतपासात विचारले जाणारे प्रश्न विचारले असता त्यामध्ये त्यांनी फिर्याद व त्यांच्या जबाबामधील अधोरेखांकित भाग 'अ' नाकारला. पोलीसांनी फिर्याद व त्यांच्या जबाबामध्ये तसे का नमुद केले याचे कारण सांगू शकत नसल्याचे कथन केले. आरोपी व त्यांच्यात आपसात मिटल्याचे त्यांनी कथन केले. त्यामुळे प्रथम खबरी अहवालातील मजकूर सिध्द झाला नाही.

८. अभियोग पक्षाच्या एकंदरित पुराव्याचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, फिर्यादी व आरोपी यांनी आपसात तडजोड झाल्याबाबत निशाणी क्र.२६ प्रमाणे अर्ज दाखल केला व प्रकरण मिटविण्याची विनंती केली. सदर गुन्हा तडजोडी योग्य नसल्याने सदरचा अर्ज नामंजूर झाला. आरोपी व फिर्यादी यांनी आपसात तडजोड केल्याचे संयुक्तिक पुरसिस निशाणी क्र.२७ वरुन दिसून येते.

९. अभियोग पक्षाच्या एकंदरित पुराव्याचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अभियोगपक्षाने विचारलेल्या सुचक प्रश्नांमधून काहीएक उपयुक्त पुरावा आरोपीविरुध्द आलेला नाही. फिर्यादीने प्रथम खबरी अहवालाप्रमाणे घटना घडल्याचे नाकारले आहे. निशाणी क्र.३३ वरील घटनास्थळ पंचनामा, नि.क्रं ३४ व ३५ वरील वैदयकिय प्रमाणपत्र जरी आरोपीच्या वकीलांनी मान्य केले असले, तरी आरोपींनी फिर्यादी व त्यांचा मुलगा यांच्या डोक्यावर विटकरीच्या तुकडयाने मारहाण करुन जखमी केले, थापड-बुक्यांनी मारहाण केली व शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली, या बाबी फिर्यादी (अ.सा.क्र.१) व इतर साक्षीदार यांनी त्यांच्या साक्षीमध्ये स्पष्टपणे सांगितल्या नाहीत. त्यामुळे फिर्यादी व त्यांचा मुलगा यांच्या

डोक्यावर विटकरीच्या तुकडयाने मारहाण करुन जखमी केले, थापड–बुक्यांनी मारहाण केली व शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली, या बाबी सिध्द होत नाहीत.

**१०.** अभियोग पक्षातर्फे दाखल केलेल्या वरील एकत्रित पुराव्यावरून सदर प्रकरणामध्ये आरोपींनी फिर्यादी व त्यांचा मुलगा यांच्या डोक्यावर विटकरीच्या तुकडयाने मारहाण करुन जखमी केले, थापड–बुक्यांनी मारहाण केली व शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली, या बाबी फिर्यादी व ईतर साक्षीदार यांनी अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने अभियोग पक्ष संशयापलिकडे जावून सिध्द करु शकले नाही. अशा परिस्थीतीमध्ये घटनेतील फिर्यादी व साक्षीदार हे जर घटना स्पष्टपणे सांगत नसतील तर त्यांच्या वरील साक्षी पुराव्यावरुन आरोपींवरील दोषारोप संशयापलीकडे जावून सिध्द होत नाहीत. करीता अभिलेखावरील पुराव्या अभावी आरोपीं वरील आरोप सिध्द होत नाहीत. सबब मुद्दे क्र.१ ते ५ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र. ६ बाबतः</u>**

**११.** मुद्दे क्र. १ ते ५ चे उत्तर नकारार्थी आहेत. त्यामुळे यातील आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. सबब या मुद्दा क्र.६ च्या उत्तरासाठी मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्रं **१– राजु अशोक कांबळे २– अनिल अशोक कांबळे ३– कुसुमबाई अशोक कांबळे ४– कोमल राजु कांबळे रा.काळेश्वर हदगाव जि. नांदेड** यांची भारतीय नागरीक सुरक्षा संहिता चे कलम २७१(१) अन्वये भारतीय न्याय संहिताचे कलम११८(१), ११५(२), ३५२, ३५१ (२), ३५१(३) सह कलम ३(५) या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तिक व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपींनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ४८१(१) चे पूर्ततेसाठी प्रत्येकी रक्कम रु.१०,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व तेवढ्याच रक्कमेचा जामीन दयावा, की जो आजपासून पुढील ०६ महिन्यांसाठी अंमलात असेल.

४. हदगाव पोलीस ठाणे येथील मुददेमाल एम.आर.क्रं २८/२०२५ दि. ०१/०४/२०२५ मधील जप्त मुद्देमाल एक विटकरीचा तुकडा मुल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)**

AMARJEET BHARATRAO JADHAV
Digitally signed by AMARJEET BHARATRAO JADHAV
Date: 2026.08.11 17:26:10 +0530

दिनांकः ११.०८.२०२६
ठिकाणः हदगाव.

**(अमरजीत भारतराव जाधव)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, हदगाव
ता. हदगाव, जि. नांदेड.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, संगणक प्रणालीमध्ये क्रमावली नक्कल करुन घातलेल्या न्यायनिर्णयामध्ये शब्दनाब्दहा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नावः | – | अनिता एस गोदाम |
| न्यायालयाचे नावः | – | न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय, हदगाव, ता. हदगाव, जि. नांदेड. |
| न्यायनिर्णयचा दिनांकः | – | ११/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयवर पिठासन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याचा दिनांकः | – | ११/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय संगणक प्रणालीमध्ये अपलोड केल्याचा दिनांकः | – | ११/०८/२०२६ |